राज्यातील शारिरीकदृष्ट्या अपंगाचे तालुका
<u>पातळीवर सर्वेक्षण करण्याबाबत...</u>

नवीन योजना ....

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. हसंगो १०९३/प्र. १९२/सुधार-२.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ फेब्रुवारी, १९९४

वाचा: १] संचालक, म. बा. व अ. वि. महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे पत्र क्रमांक:
अपंग/सांख्यिकी बाल/क्र. १/९३-९४/का-२/९३, दि. २. २. १९९३.

२] शासन ज्ञापन, स. क. सां. का. व क्री. वि. क्र. बीजीटी १०९४/
प्र. ९/अर्थसंकल्प, दि. १५. १. १९९४.

<u>उपोद्घात</u> : १९८१ साली जनगणना संचालनालयाकडून अपंगांची मोजणी करण्यात आली. ही मोजणी सर्वसामान्य जनगणनेच्या कामासोबत घेण्यात आली. अपंगाची त्यावेळी उपलब्ध असलेली संख्या पूर्णपणे अंध, पूर्णपणे मूकबधिर आणि पूर्णपणे विकलांग अशा प्रकारची आहे. ही संख्या रास्त नाही. तसेच मतीमंदांची गणनाही केलेली नाही.

अपंगांच्या योजना परिणामकारकतेने राबवावयाच्या झाल्यास अपंगांची व्यक्ति-गणिक खानेसुमारी होणे अत्यंत आवश्यक आहे. उदा. अंध, आंशिक अंध, मुकबधिर, आंशिक मूकबधिर, विकलांग, मतिमंद इ. त्यामुळे अपंगांना त्यांचे अपंगत्व लक्षात घेऊन योग्य ती मदत त्यांच्या पुनर्वसनात्मक कार्याच्या उद्देशाने करता येणे शक्य होईल. अपंगांच्या पुनर्वसनासाठी कार्यक्रम निश्चित करता येईल. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन राज्यातील अपंगांची मोजदाद पाहणी [सर्वेक्षण] करण्याचे काम सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> : राज्यातील शारिरीकदृष्ट्या अपंगाचे तालुका पातळीवरून सर्वेक्षण करण्याबाबतच्या योजनेस शासन आता मान्यता देत आहे. हे काम घरोघरी जाऊन अपंगाची माहिती गोळा करून सुरू करण्यात येईल. राज्यातील एकूण ३०२ तालुक्यातून अपंगाचे सर्वेक्षण निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने करण्यात येईल. हे सर्वेक्षण प्राथमिक शिक्षक व आरोग्य कर्मचारी, यांच्या सहाय्याने करावयाचे आहे. यासाठी जिल्हा परिषद, गट विकास अधिकारी, प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांचे सहकार्य अपेक्षित आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने त्याप्रमाणे त्यांचे परिपत्रक क्रमांक १०/ सोआप ३९५/९१/आरोग्य-८, दि. २८. १. १९९१ अन्वये योग्य त्या सूचना सर्व संबंधीतांना दिलेल्या आहेत. [परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.]

२. अपंगाचे सर्वेक्षण करण्याबाबतची योजना कार्यान्वित करण्यासाठी, तिची प्रसिध्दी

.....२..

करणे, सर्वेक्षण फार्मसूची छपाई करणे, प्रवास भत्ता खर्चासाठी प्रत्येक तालुक्यासाठी खा खालीलप्रमाणे रु. १०,०००/- [रुपये दहा हजार फक्त] इतकी रक्कम मंजूर करण्यात येत आहे:

| | |
|---|---|
| १] जाहीरात | रु. २५००/- |
| २] स्टेशनरी छपाई व इतर किरकोळ | रु. ५०००/- |
| ३] प्रवास भत्ता | रु. २५००/- |
| | रु. १०,०००/- |

३. सन १९९३-९४ या आर्थिक वर्षासाठी सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण २० जिल्हयांनी रु. ७,५०,०००/- [रुपये सात लाख पन्नास हजार फक्त] इतकी तरतूद केली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हयांनी प्रस्तावित केलेल्या नियतव्ययानुसार सोबतच्या विवरणपत्र "अ"मध्ये नमूद केल्याप्रमाणे तालुक्यांतील अपंगांच्या सर्वेक्षणाचे काम सुरु करण्यासाठी शासन रु. ७,५०,०००/- [रुपये सात लाख पन्नास हजार फक्त] इतक्या रकमेच्या खर्चास मंजूरी देत आहे.

४. संचालक, महिला, बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपंगाच्या सर्वेक्षणाचे काम त्वरित सुरु करण्याबाबत योग्य ती कार्यवाही त्वरीत सुरु करावी.

५. सदरचा खर्च वित्तीय शिर्ष "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-१०१-अपंग कल्याण [५] शारिरीकदृष्टया अपंगासाठी इतर योजना [बी] पंचवार्षिक योजनांतर्गत योजना [आठ] राज्यातील शारिरीकदृष्टया अपंग व्यक्तीचे सर्वेक्षण मागणी क्र. एन-७" या खाली पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून भागविण्यांत यावा.

६. हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ६२३/व्यय-१९, दि. १५-९-१९९३ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ कुंदा गोसावी ]
कार्यासन अधिकारी.

प्रति:
संचालक, महिला, बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा महिला, बाल व अपंग विकास अधिकारी.
संचालक, आरोग्य सेवा [आरोग्य] महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
ग्राम विकास विभाग, मंत्रालय.
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
का-अर्थसंकल्प, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती.

सोरते/७२९४....

७

## विवरणपत्र "अ"

अपंगाचे सर्वेक्षण करण्यासाठी संबंधित जिल्ह्यांनी केलेली तरतूद व सर्वेक्षण सुरु करावयाच्या तालुक्यांची संख्यादर्शक माहिती.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | तालुक्यांची संख्या | खर्च [लाखात] |
|---|---|---|---|
| १] | ठाणे | ६ | ०.६० |
| २] | रायगड | १ | ०.१० |
| ३] | नासिक | १३ | १.३० |
| ४] | धुळे | ७ | ०.७० |
| ५] | अहमदनगर | १ | ०.१० |
| ६] | पुणे | १ | ०.१० |
| ७] | सोलापूर | १ | ०.१० |
| ८] | कोल्हापूर | १ | ०.१० |
| ९] | अकोला | १ | ०.१० |
| १०] | यवतमाळ | ८ | ०.८० |
| ११] | नागपूर | ४ | ०.४० |
| १२] | वर्धा | १ | ०.१० |
| १३] | भंडारा | २ | ०.२० |
| १४] | चंद्रपूर | २ | ०.२० |
| १५] | गडचिरोली | १ | ०.१० |
| १६] | औरंगाबाद | ८ | ०.८० |
| १७] | जालना | ४ | ०.४० |
| १८] | बीड | ५ | ०.५० |
| १९] | परभणी | ७ | ०.७० |
| २०] | नांदेड | १ | ०.१० |
| | एकूण — | ७५ | ७.५० |

सोरते/१२९४....

शारिरीक दृष्टया अपंग व्यक्तींची जनगणना.

जिल्हा परिषद/आरोग्य विभागातील
अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
परिपत्रक क्र. संकीर्ण १०९०/सीआर-३१२/आरोग्य-८,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८.१.१९९१.

परिपत्रक :-

राज्य तथा केंद्र शासनामार्फत अपंगाच्या शारिरीक, आर्थिक तथा शैक्षणिक पुर्नवसनासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. अपंगांची निश्चित आकडेवारी उपलब्ध नसल्याने आणि कोणत्या क्षेत्रात कोणत्या स्वरुपाचे अपंग आहेत याची नोंद माहिती नसल्याने अनेक अपंगांना विशेषत: दुर्गम/मागास भागातील अपंगांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. तसेच निश्चित आकडेवारीच्या अभावी कोणत्या क्षेत्रातील अपंगांना कोणत्या स्वरुपाची मदत हवी आहे हेही ठरविता येत नाही. राज्य तसेच केंद्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ योग्यरित्या अपंगांना देण्याच्या दृष्टीने तसेच अपंगासाठी असलेल्या योजना अधिक परिणामकारकरित्या राबविता याव्यात म्हणून शासनाच्या समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागातर्फे अपंगांची जनगणना करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

२. शारिरीक दृष्टया अपंग असलेल्या व्यक्तींची जनगणना करण्याच्या कामासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम २६१ [२][अ] मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या खालील कर्मचाऱ्यांच्या सेवा समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागास त्वरीत उपलब्ध करुन द्याव्या :-

[अ] जिल्हा आरोग्य अधिकारी,
[ब] समन्वयक [कुटुंब कल्याण] जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयातील.
[क] गटस्तरीय पर्यवेक्षक [ब्लॉक लेव्हल सुपरव्हायझर]
[ड] बहुउद्देशीय कर्मचारी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
[ र. ना. अंबरित ]
कार्यासन अधिकारी

प्रत -
सचिव, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सहसंचालक, आरोग्य सेवा, मंडळ कार्यालये
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
उपसचिव [सेवा], सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
डॉ. एफ. एस. अब्दूल सलीम, विशेष कार्य अधिकारी, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आरोग्य-८ [निवड धारिका].

एच १२९४.